# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायंकाळ)

जा.क्र. ६६९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/१०/२०१६

**१) क्षुल्लक कारणावरून हातातील कडयाने डोक्याला मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ११/१०/२०१६ रोजी १७.०० ते १८.०० वा. दर. यातील फिर्यादी लोकेश केवळराम सार्वे वय ३६ वर्ष, रा. माटोरा कडुन सुरेवाडा कडे रोडने जात असतांना यातील आरोपीने रस्त्यात थांबवुन तु माझ्या वडीलाची बदनामी का केली म्हणुन उजव्या हातातील पांढ—या धातुच्या कडयाने डोक्याचे मागचे बाजुस मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३४१,३२४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**२) संगनमत करून शिविगाळ व काठीने डोक्याला मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ११/१०/२०१६ रोजी १४.३० वा. दर. यातील फिर्यादीने आरोपींना मोबाईल फोन करुन तुम्ही मुलीला घेवुन जाण्या करीता या व आल्या नंतर कशाकरीता बोलावले या वरुन ३ आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी व फिर्यादीचा मुलगा जोतीष व पत्नी सौ. बबीता यांना शिविगाळ व भांडण करुन जोतीष याला काठीने डोक्यावर वरचे भागाला मारुन जखमी केल्याने फिर्यादी बन्सीलाल केशवराम डोंगरे वय ४९ वर्ष, रा. मुंडीकोटा जि. गोंदीया यांचे व डॉ. रिपोर्ट वरून पोस्टे. दिघोरी येथे कलम ३२४,३२३,५०४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पो. स्टे. दिघोरी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) मंदीराची नुकसान करून अपवित्र केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिंनाक. ११/१०/२०१६ रोजी ०९.३० वा. पुर्वी यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने गावातील लोकांची श्रध्दा असलेली मंदीरातील आतील भागाला चिखल लावुन मंदीरातील नुकसान करुन अपवित्र केल्याने फिर्यादी व गावातील लोकांच्या भावना दुखावल्याने फिर्यादी उमेश महादेव हरडे वय ३८ वर्ष, रा. नायगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे पवनी येथे कलम २९५ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गदादे पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) प्रकृती खराब झाल्याने मुलीचा उपचारा दरम्यान मृत्यु . :—**

दिंनाक. १०/१०/२०१६ रोजी २२.०० वा. दर. यातील मृतक— कु. जयश्री शालीक डहाके वय १६ वर्ष रा. पालडोंगरी हीची प्रकृती बिघडल्याने तीला औषधोपचारा करीता सा.रू. भंडारा येथे आकस्मीक विभागात दि. १०/१०/२०१६ रोजी २२.०० वा. आनले असता तेथील डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पो.स्टे. आंधळगाव येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. रंगारी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बाभरे पो. स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

५) जागेच्या वादावरून शिविगाळ व बासाच्या कठीने मारहाण केली. :—

दिनांक ११/१०/२०१६ रोजी १७.३० वा. दर. यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच जातीचे असुन घरा शेजारी राहत आहे त्यांच्या घराचे जागेवरून जुना वाद असुन बोलाचाली बंद आहे फिर्यादी हा आपल्या घरासमोरील रोडवर उभा असतांना यातील आरोपीने माझे जागेवर बांधकाम का केले असे म्हणुन झगडा भांडण व शिविगाळ करून आपल्या घरून बासाची काठी आणुन फिर्यादीचे उजवे हाताला व पाठीवर मारून गंभिर दुखापत केल्याने फिर्यादी देवा ईश्वर तुरस्कर वय ३५ वर्ष रा. आझाद चौक पवनी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता